11 JUL 2018

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वारीत होणार प्लास्टिकमुक्तीचा जागर

## शिवाजी विद्यापीठातील ६०० विद्यार्थ्यांकडून मार्गावर पत्रावळ्यांचे वाटप

**संदीप खांडेकर :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १० : विठ्ठलनामाच्या जयघोषात तल्लीन होणाऱ्या वारकऱ्यांच्या दिंडीत शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी प्लास्टिकमुक्तीचा जागर करणार आहेत. विद्यापीठाशी संलग्नित २० महाविद्यालयांतील सुमारे सहाशे स्वयंसेवक दिंडीच्या मार्गावर पर्यावरणपूरक पत्रावळ्यांचे वाटप करणार आहेत. त्या पत्रावळ्या पुन्हा संकलित करून त्यांचे सेंद्रिय खत तयार केले जाणार आहे. विशेष म्हणजे या खताचे शेतकऱ्यांना मोफत वाटप होणार आहे. १३ ते १७ जुलैपर्यंत दिंडी मार्गावर विद्यापीठाच्या स्वयंसेवकांचे गट कार्यरत राहणार आहेत.

विद्यापीठाचे कोल्हापूर, सांगली, सातारा कार्यक्षेत्र आहे. संलग्नित एकूण २८१ पैकी १६० महाविद्यालयांत राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक आहेत. त्यांची संख्या २७ हजार इतकी आहे. खेडोपाड्यात शिबिरांच्या माध्यमातून स्वयंसेवक रस्ते, गटारींची कामे करतात. आरोग्य, शिक्षण, आर्थिक स्थिती यांचा सर्व्हेही करतात. ते आता पंढरीच्या वारीत सहभागी होऊन नावीन्यपूर्ण उपक्रमाने वारीची शोभा वाढवणार आहेत.

सातारा जिल्ह्यातील १५ महाविद्यालयांतील स्वयंसेवकांचा यात सहभाग असेल. लालबहादूर शास्त्री (सातारा), मीनलबेन मेहता (पाचगणी), पान ७ वर »



### स्वयंसेवक कार्यरत असणारी ठिकाणे

- ता. १३ जुलै - वाल्हे, निरा, लोणंद
- ता. १४ - लोणंद, तरडगाव
- ता. १५ - तरडगाव, निंभोरे ओढा, वडजल, फलटण
- ता. १६ - फलटण, विडणी, पिंपरद, निंबळक फाटा, बरड
- १७ - बरड (समारोप)



## वारीत होणार प्लास्टिकमुक्तीचा जागर

» पान १ वरून

छत्रपती शिवाजी (सातारा), आर्टस अँड कॉमर्स (सातारा), दहिवडी (दहिवड), शहाजीराजे (खटाव), यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्युट ऑफ सायन्स (सातारा), आर्टस अँड कॉमर्स (वडूज), सरदार बाबासाहेब (रहिमतपूर), आर्टस अँड कॉमर्स (वाठार), इजिनिअरिंग (फलटण), नामदेवराव सूर्यवंशी बेंडके (पाटण), शंकरराव जगताप आर्टस अँड कॉमर्स (वाघोली), आर्टस अँड कॉमर्स (नागठाणे) व मुधोजी महाविद्यालयातील स्वयंसेवक दिंडीत सहभागी होण्यास आतूर झाले आहेत. कोल्हापूर व सांगलीतील स्वयंसेवकही उपक्रमात भाग घेतील.

प्लास्टिक, थर्माकोल, स्टील प्लेटऐवजी पानांच्या पत्रावळी वापरण्याचे आवाहन स्वयंसेवक करणार आहेत. स्वयंसेवी संस्थांनी पत्रावळ्या महाविद्यालयांकडे सुपूर्द केल्या आहेत. त्यांचे वाटप स्वयंसेवक दिंडी प्रमुख व वारकऱ्यांना करणार आहेत. वापरलेल्या पत्रावळ्या संकलित करण्याचे कामही ते करणार आहेत. त्याचे खत तयार करण्यातही त्यांचा सहभाग असणार आहे.

**“ वारी सोहळा पर्यावरणपूरक व्हावा, यासाठी स्वयंसेवकांना त्यात सहभागी करत आहोत. राष्ट्रीय पातळीवरील स्वच्छ भारत अभियानांतर्गत प्लास्टिक कचरामुक्त दिंडीस अनुसरून उपक्रम आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याचे नियोजन केले आहे.**

**- डॉ. डी. के. गायकवाड, समन्वयक, राष्ट्रीय सेवा योजना, शिवाजी विद्यापीठ**

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUL 2018

# प्रा.डॉ. पी. एस. पाटील यांची 'टॉप टेन' शास्त्रज्ञांत निवड

**कोल्हापूर, ता. १० :** शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजीचे समन्वयक अधिष्ठाता प्रा. डॉ. पी. एस. पाटील मटेरियल सायन्स विषयाच्या संशोधनात भारतातील सर्वोत्कृष्ट दहा (टॉप टेन) शास्त्रज्ञांमध्ये गणले गेले आहेत. 'करिअर-३६०' शैक्षणिक संस्थेतर्फे झालेल्या सर्वेक्षणानुसार त्यांची निवड झाली. संस्थेकडून त्यांना यंदाच्या सर्वोत्कृष्ट संशोधक अध्यापक पुरस्काराने गौरविण्यात आले.

डॉ. पाटील यांनी सौरघट, गॅससेन्सिंग, सुपरकॅपॅसिटर क्षेत्रातील संशोधनाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर भरीव कामगिरी केली आहे. त्यांच्या चमूला सौर घटाची कार्यक्षमता वाढविण्यातही यश आले. ते सत्तावीस वर्षे मटेरियल सायन्सच्या क्षेत्रात संशोधन कार्य



करीत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ४५ विद्यार्थ्यांनी डॉक्टरेट प्राप्त केली आहे. आजवर आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांचे ४३५ शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या शोधनिबंधांना १२ हजारांहून अधिक सायटेशन आहेत. त्यांच्या नावावर समाजोपयोगी पाच पेटंटस् नोंद आहेत. त्यांचा एच-इंडेक्स (h-index) ५६ असून आय टेन इंडेक्स (i -१०-index) २८९ इतका आहे. त्यांचे संशोधन लेख ७० हजारांहून अधिक शास्त्रज्ञ तसेच संशोधक विद्यार्थ्यांनी अभ्यासले आहेत. त्यांच्या संशोधन क्षेत्रासंदर्भात त्यांची पाच पुस्तके प्रकाशित आहेत. शोधनिबंधांमधील सूक्ष्म पदार्थांच्या छायाचित्रांची नोंद जागतिक स्तरावर घेतली आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध संस्था आणि विद्यापीठांशी शैक्षणिक व संशोधन करार करून विद्यापीठातील ५० हून अधिक विद्यार्थ्यांना पोस्ट डॉक्टरेटसाठी परदेशी पाठविले आहे. तसेच त्यांनी आतापर्यंत भारत सरकारच्या LIGO, DRDO, INSA, AICTE, DAE- BRNS, DST अशा विविध संस्थांकडून विद्यापीठातील संशोधन प्रकल्पासाठी दोन कोटी ५० लाखांहून अधिक निधी मंजूर करून आणला आहे.

जपान व इजिप्त या देशांनी मंजूर केलेले दोन आंतरराष्ट्रीय प्रकल्प त्यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केले आहेत. सौरऊर्जा व पवन ऊर्जा यांच्यावर आधारित ऊर्जा तंत्रज्ञान या विभागाचेही त्यांनी नेतृत्व केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUL 2018
तरुण भारत

# डॉ. पी. एस. पाटील देशातील सर्वोत्कृष्ट संशोधक

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागाचे प्राध्यापक, स्कूल ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे समन्वयक तथा विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील मटेरियल सायन्स विषयाच्या संशोधनात भारतातील सर्वोत्कृष्ट दहा (टॉप टेन) शास्त्रज्ञांमध्ये गणले गेले आहे. 'करिअर-३६०' या शैक्षणिक संस्थेकडून करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार त्यांची ही निवड करण्यात आली. तसेच संस्थेकडून त्यांना या वर्षीचा 'सर्वोत्कृष्ट संशोधक अध्यापक' पुरस्कार देऊन नुकतेच गौरविण्यात आले आहे.

डॉ. पाटील यांनी सौर घट, गॅस सेन्सिंग, सुपरकॅपॅसिटर या क्षेत्रातील संशोधनाच्या माध्यमातून जागतिक स्तरावर भरीव कामगिरी केली आहे. ते गेली २७ वर्षे मटेरियल सायन्सच्या क्षेत्रात संशोधन करीत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ४५ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. प्राप्त केली आहे. आंतराष्ट्रीय स्तरावर त्यांचे ४३५ शोधनिबंध प्रसिद्ध झाले असून, त्यांच्या संशोधन कार्याचा संदर्भ १२,००० हून अधिक संशोधकांनी त्यांच्या शोधनिबंधांमध्ये दिला आहे. त्यांच्या नावावर समाजोपयोगी पाच पेटन्ट्स आहेत. त्यांचे संशोधन लेख ७० हजारहून अधिक शास्त्रज्ञ व संशोधक विद्यार्थ्यांनी अभ्यासले आहेत. त्यांच्या संशोधन क्षेत्रासंदर्भात त्यांची पाच पुस्तके प्रकाशित आहेत.




**'करिअर ३६०' च्या सर्वोत्कृष्ट संशोधन अध्यापक पुरस्काराने सन्मानित**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUL 2018
पुढारी

# विद्यापीठात 'पेटंट रायटिंग' विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या बौद्धिक संपत्ती अधिकार कक्षाच्या वतीने १२ जुलैपासून 'पेटंट रायटिंग' या विषयावर चार दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. मर्यादित ४० सदस्यांचा या कार्यशाळेत सहभाग असणार आहे. ही कार्यशाळा विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील इंटरनेट कक्षामध्ये सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत होणार आहे. कार्यशाळेसाठी पुणे येथील टीसीएस येथील आयपी मॅनेजर नीलेश पंडित, ग्रिडलॉजीज टेक्नॉलॉजी प्रा.लि.चे तुषार सुरती, डॉ. अनिल घुले मार्गदर्शन करणार आहेत. या चार दिवसीय कार्यशाळेमध्ये पेटंट मिळविण्यासंदर्भात मार्गदर्शन करणे,



शिवाजी विद्यापीठातून...

बौद्धिक संपत्ती अधिकारांच्या माहितीबद्दल जागरुकता निर्माण करणे, विविध विषयांमधील 'पेटंट' कशा पद्धतीने दाखल करावेत, याची माहिती दिली जाणार आहे.

तसेच या क्षेत्रामध्ये उपलब्ध असलेले संशोधन कार्य या विषयांवर विस्तृत चर्चा होणार असल्याची माहिती विद्यापीठाच्या आयपीआरसीचे संचालक डॉ. अनिल घुले यांनी दिली. कार्यशाळेचा समारोप १५ जुलैला होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 JUL 2018
सकाळ

# शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे होणाऱ्या युवा महोत्सवाची माहिती विद्यार्थ्यांना देण्यासाठी १३ ते १५ जुलै एकदिवसीय कार्यशाळांचे आयोजन केले आहे. विद्यार्थी विकास विभागातर्फे बैठका होणार आहेत. १३ जुलैला फलटण (जि. सातारा) येथील मुधोजी महाविद्यालय, १४ जुलैला सांगलीतील विलिंग्डन महाविद्यालय, तर १५ जुलैला विद्यापीठातील वि. स. खांडेकर भाषा भवन येथे बैठक होणार आहे. या बैठकांना सकाळी दहाला सुरवात होईल. त्यासाठी महाविद्यालयातील एक विद्यार्थी, विद्यार्थिनी व सांस्कृतिक विभागाकडील एक प्राध्यापक यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी केले आहे.